
## बिबटची पिल्ले गावाजवळ दिसल्यास...

- माहिती तपासून पहा. ▪ त्या क्षेत्राला प्रतिबंधित करा.
- पिल्लांना हात लावू नका.
- फोनवरुन माहिती वनविभागाला द्या.
- बिबटच्या पिलांना सुरक्षित ठेवा व लोकांना दूर ठेवा.
- कुत्रे व इतर प्राण्यांना पिल्लांपासून दूर ठेवा.
- त्यांना कोणतेही खाद्य देऊ नका.
- दगडे व काठ्या मारु नका.
- मदत येईपर्यंत सुरक्षित अंतरावरुन त्यांचे निरीक्षण करा.
- कोणतीही अफवा/छायाचित्र पसरवू नका.

## बिबट घरात/गोठ्यात घुसल्यास...

- घरातील लोकांना प्रथम बाहेर काढा.
- घराचे दार बाहेरुन बंद करा.
- वन्य प्राणी बाहेर जाऊ नये याची काळजी घ्या.
- फोनद्वारे तात्काळ वनविभागाला माहिती द्या.
- त्या क्षेत्राला प्रतिबंधित करा.
- आसपासचे लोक घरी सुरक्षित असल्याची काळजी घ्या, लोकांनी घराची दारे व खिडक्या बंद ठेवाव्यात.
- लहान मुले व वयस्कर नागरीकांना दूर ठेवा.
- स्वत:ला सुरक्षित ठेवा.
- पाळीव प्राण्यांना वाचविण्याचा प्रयत्न करु नका.
- जर गोठा बंद नसेल तर बिबट आपोआप निघून जाईल.
- वनविभागाचे कर्मचारी येईपर्यंत दक्षता घ्या.



हॅलो फॉरेस्ट टोल फ्री क्रमांक : १९२६

## जखमी वन्यप्राणी दिसल्यास...

- वन्य प्राण्याजवळ कोणीही जाऊ नये.
- कोणीही दगड व काठ्यांनी मारु नये.
- लोकांना त्या प्राण्यापासून दूर ठेवा.
- गर्दी व आरडाओरडा होऊ देऊ नका.
- सुरक्षित अंतर ठेवा.
- वनविभागाला त्वरीत फोनद्वारे माहिती द्या.
- वनविभागाचे कर्मचारी येईपर्यंत त्या प्राण्याला छेडू नका.
- गावाजवळ वन्यप्राण्याचा असामान्य आवाज आल्यास वनरक्षकाला त्वरीत माहिती द्या.

## जखमी व्यक्तीला मदत करा...

- वनविभागाला त्वरीत फोनद्वारे माहिती द्या.
- जखमीला सुरक्षित जागी घेऊन जा.
- जखमी व्यक्तींचे छायाचित्र घ्या.
- लोकांना सांभाळा. ▪ त्या क्षेत्राला प्रतिबंधित करा.
- जखमीला रुग्णालयात दाखल करा.

## वन्यप्राणी जाळ्यात फसल्यास.

- वनविभागाला त्वरीत फोनद्वारे माहिती द्या.
- दगड अथवा काठीने मारु नका. ▪ त्या प्राण्याला डिवचू नका.
- त्या प्राण्याची सुटका करण्याचा प्रयत्न स्वतः करु नका.
- सुरक्षित अंतरावरुन प्राण्यांचे निरीक्षण करा.
- मदतीची वाट पहा. ▪ लोकांना दूर ठेवा.
- त्याचे छायाचित्र घ्या. ▪ वनविभागाची मदत करा.

